ग्रंथमालिका ‘धर्माचरण’ : खंड ३

# सण साजरे करण्याच्या योग्य पद्धती आणि शास्त्र

मराठी (Marathi)

**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि पू. संदीप गजानन आळशी**

**सनातन संस्था**


卐 **सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या** 卐

मराठी ३४४, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**सप्टेंबर २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९७ लाख ५९ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.९.२०२४ पर्यंत १२८ साधक संत झाले, तर १,०४३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

---

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक ‘सनातन प्रभात’मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

(प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**卐 प्रकरण १. वर्षातील प्रमुख सण, धार्मिक उत्सव आणि व्रते** ११

**卐 प्रकरण २. ऋतूंनुसार सणांचे प्रमाण आणि सण साजरे करण्याची पूर्वसिद्धता** १५

२ अ. वर्षा, शरद आणि हेमंत या ऋतूंत सणवार जास्त प्रमाणात असणे १५

२ आ. सण साजरा करण्यापूर्वी करावयाची तयारी १५

**卐 प्रकरण ३. हिंदु धर्मातील विविध सण** १६

३ अ. गुढीपाडवा (वर्ष प्रतिपदा) १६

३ अ ३. गुढीपाडवा साजरा करण्याची पद्धत १८

३ आ. अक्षय (अक्षय्य) तृतीया २६

३ आ ३. अक्षय तृतीयेला करावयाची कृत्ये २७

३ इ. नागपंचमी २९

३ इ ३. नागाचे माहात्म्य २९

३ ई. श्रावण पौर्णिमा (नारळी पौर्णिमा) ३०

३ उ. नवरात्र ३४

३ ऊ. दसरा (विजयादशमी) ३४

३ ऊ ६. दसरा साजरा करण्याची पद्धत ३६

३ ए. वसुबारस (गोवत्स द्वादशी) ४१

३ ऐ. गुरुद्वादशी ४२

३ ओ. दिवाळी (दीपावली) ४२

३ ओ ५. आश्विन वद्य त्रयोदशी ४४

३ ओ ६. नरक चतुर्दशी ४६

३ ओ ७. आश्विन अमावास्या ४७

३ ओ ८. बलीप्रतिपदा (दिवाळी पाडवा) ५१

३ ओ ९. भाऊबीज (यमद्वितीया) ५३

३ ओ १०. दीपावलीचे स्वरूप ५४

३ ओ १२. दिवाळी साजरी करण्यासाठी फटाके वाजवू नका ! ५७

३ औ. तुळशी विवाह ५८

३ अं. देवदिवाळी ५९

३ क. मकरसंक्रांत ५९

३ ख. रथसपतमी ६४

卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ६६

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ६८

हा ग्रंथ ‘इ-बुक’ स्वरूपात उपलब्ध ! : Sanatanshop.com/ebooks

## मनोगत

### १. सण, धार्मिक उत्सव आणि व्रते साजरे करण्याचे उद्देश

**अ. सर्वसाधारण माहिती :** आमचे सण आणि उत्सव हे असे आहेत की, जे इहलोकी सुखावह होतातच, शिवाय मृत्यूनंतर सद्‌गती देतात.

**आ.** निसर्गातील बदल, उदा. नारळी पौर्णिमा. पावसाळा संपत आला की समुद्र शांत होतो, तेव्हा नारळी पौर्णिमा साजरी करतात.

**इ.** अवतारांच्या जन्मतिथी, उदा. श्रीराम नवमी. श्रीराम, श्रीकृष्ण इत्यादी अवतारांच्या जन्मतिथी साजऱ्या करतात; कारण देहत्याग हा त्यांचा मृत्यू नसतो. ते भक्तांसाठी केव्हाही देह धारण करू शकतात, म्हणजेच ते अमर आहेत.

**ई.** संतांच्या पुण्यतिथी, उदा. श्री ज्ञानेश्वर पुण्यतिथी. संतांच्या देहत्यागाचा दिवस साजरा करतात; कारण ते जन्माला येतात, तेव्हा बहुधा बाह्यतः केवळ सर्वसाधारण व्यक्ती किंवा साधक असतात. पुढे साधना करून ते संतपदाला पोहोचतात. देहत्यागानंतर ते उच्चलोकात जातात आणि त्यांचे कार्य आणखी वाढते; कारण देहासाठी आवश्यक असलेली शक्ती देह उरलेला नसल्याने कार्यासाठीच वापरली जाते. यासाठी त्यांच्या पुण्यस्मरणाचा दिवस म्हणून पुण्यतिथी साजरी करतात. सर्वसाधारण व्यक्तींच्या संदर्भात मात्र त्यांच्या मृत्यूदिनी श्राद्ध करणे आवश्यक असल्याने तो दिवस लक्षात ठेवतात.

**उ.** पौराणिक आणि ऐतिहासिक घटना, उदा. वटपौर्णिमा. या दिवशी सावित्रीने यमाला वादविवादात जिंकून पतीला पुन्हा जिवंत करून घेतले.

**ऊ. आध्यात्मिक शिकवण :** साधक, साधन आणि साध्य यांच्यात अद्वैत व्हावे, साधकाने परमेश्वराशी एकरूप व्हावे, हा साधनेचा एकमेव उद्देश असतो. त्या दृष्टीने एक टप्पा म्हणून साधनांतही ईश्वराचे रूप पहायला शिकण्याच्या दृष्टीने काही सण साजरे केले जातात, उदा.

ऊ १. **शीतला सप्तमी :** स्वयंपाकाच्या शेगडी, कढई, सांडशी वगैरे साधनांचा या दिवशी वापर न करता त्यांची पूजा केली जाते.

ऊ २. **पोळा :** या दिवशी शेतकरी बैल आणि नांगर यांची पूजा करतात.

ऊ ३. **विजयादशमी :** प्रत्येक जण आपापल्या साधनांची पूजा करतो, उदा. शिंपी कात्री आणि शिलाई यंत्र यांची; विद्यार्थी आणि अभ्यासक त्यांच्या पुस्तकांची वगैरे.

ऊ ४. **लक्ष्मीपूजन :** व्यापारी लोक तराजू आणि हिशोबाच्या वह्या यांची पूजा करतात, तसेच गृहिणी केरसुणीची पूजा करतात.

**२. सण, धार्मिक उत्सव आणि व्रते यांच्यातील फरक :** हा फरक स्पष्ट असा नाही; कारण काही सण हे धार्मिक उत्सव आणि व्रत म्हणूनही साजरे केले जातात, उदा. श्रीराम नवमी वैयक्तिकरीत्या साजरी करतात तेव्हा 'सण' असते, समाजात एकत्रितपणे साजरी करतात तेव्हा 'उत्सव' असते आणि संकल्प सोडून वैयक्तिकरीत्या करतात तेव्हा 'व्रत' असते.

**३. सण, उत्सव वगैरेंकडे केवळ रूढी म्हणून पाहू नका, तर त्यांमागील गूढार्थ आणि शास्त्र लक्षात घ्या ! :** भारतात अनेक सण, उत्सव आणि परंपरा आहेत. बहुतांश जण त्यांमागील गूढार्थ आणि शास्त्र लक्षात न घेता त्यांकडे केवळ रूढी म्हणून पहातात आणि त्या दृष्टीनेच ते साजरे करतात. गुढीपाडव्याला कडुनिंबाचा प्रसाद ग्रहण करतात. 'इतर कोणत्याही पदार्थापेक्षा कडुनिंबात त्या काळात जास्त प्रमाणात येणाऱ्या प्रजापति-लहरी ग्रहण करण्याची क्षमता अधिक असल्याने, त्याचा प्रसाद ग्रहण केल्याने प्रजापति-लहरींचा लाभ अधिक होतो', हे कडुनिंब ग्रहण करण्यामागील शास्त्र आहे. सण आणि उत्सव यांमागील गूढार्थ अन् शास्त्र कळले, तर ते अधिक श्रद्धेने साजरे करता येतात; म्हणून या ग्रंथात गूढार्थ आणि शास्त्र देण्यावर विशेष भर दिला आहे. प्रादेशिक-भिन्नता, लोकजीवन, उपासनेच्या पद्धती इत्यादींमुळे सण, उत्सव साजरे करतांना

ठिकाणानुसार चालीरीतींत काही वेळा फरक आढळतो. शास्त्रीय आधार नसतांनाही केवळ पूर्वापार चालत आलेली लौकिक प्रथा म्हणून एखादी प्रथा साजरी करणे हे अयोग्य आहे. अशा लौकिक प्रथांना मूठमाती देऊन शास्त्रसंमत कृती करणेच आवश्यक असते. व्रतांच्या संदर्भात, त्यांच्यामागे एखाद्या उन्नतांचा संकल्प असतो, हेच त्यांच्यामागचे शास्त्रीय कारण होय.

**४. धर्म आणि संस्कृती यांची हानी करणाऱ्या प्रथांना विरोध करा ! :** अशा प्रथांनी हल्ली जनमानसात महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे, उदा. दिवाळी आणि गणेशोत्सव यांप्रसंगी फटाके वाजवले जातात, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव यांच्या निमित्ताने अनेक गैरप्रकार होतात. 'या प्रथा म्हणजेच सण किंवा उत्सव साजरा करण्याची पद्धत', असा चुकीचा संस्कार भावी पिढीवर होऊ लागला आहे. या प्रथांवर बहिष्कार टाकणे आणि त्यांना विरोध करणे, हे धर्मपालनच आहे. या ग्रंथांत अशा काही अनिष्ट प्रथांमधील फोलपणा दर्शवला आहे.

**५. सण, धार्मिक उत्सव आणि व्रते यांचे ईश्वरप्राप्तीच्या दृष्टीने महत्त्व**

अ. सण, उत्सव आणि व्रते यांना अध्यात्मशास्त्रीय आधार असल्याने ते साजरे करतांना त्यांतून चैतन्यनिर्मिती होते आणि त्यायोगे अगदी सर्वसामान्य मनुष्यालाही ईश्वराकडे जाण्यास मदत होते.

आ. साधकांच्या दृष्टीने कर्मकांड जरी कनिष्ठ दर्जाचे असले, तरी साधना न करणाऱ्यांना हळूहळू साधनेकडे वळविण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे ठरते. कर्मकांडाच्या दृष्टीने सण, धार्मिक उत्सव आणि व्रते इतकी महत्त्वाची आहेत की, वर्षातील जवळजवळ ७५ टक्के तिथींना यांपैकी काही ना काही असतेच.

इ. वास्तविक आपल्या जीवनात नेहमीच संयम पाहिजे; पण तो पाळला जात नाही; म्हणून निदान सण, धार्मिक उत्सव आणि व्रत यांच्या दिवशी तरी तो पाळला जावा, म्हणजे हळूहळू नेहमीच संयमित जीवन जगता येईल.

सण, उत्सव आदींमागील शास्त्र लक्षात घेऊन ते श्रद्धापूर्वक साजरे केले जावोत आणि त्यायोगे जीवन कल्याणमय होवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाध्यांनी संबोधले जात आहे. त्यामुळे त्यापूर्वीच्या लिखाणात त्यांच्या नावाच्या आरंभी ‘श्रीसत्‌शक्ति’ किंवा ‘श्रीचित्‌शक्ति’ ही उपाधी लावलेली नाही. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)


**अलंकारांविषयी स्त्रियांना योग्य दृष्टीकोन सांगणारे सनातनचे ग्रंथ !**

- हाता-पायांत घालायचे अलंकार
- बिंदीपासून कर्णभूषणांपर्यंतचे अलंकार

